# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. ३३१/२०१०**

१. श्री गुलाब रामदास डोंगरे - **तक्रारकर्ता**
२६६, कुकडे ले आऊट, रामेश्वरी रोड
पो. भगवान नगर.
ता. जि. नागपूर - ४४००२७

२. जनमाहिती अधिकारी तथा प्रमुख कार्यवाह - **गैरतक्रारदार**
ठवरे गृह निर्माण सहकारी संस्था
न्यु सुभेदार ले आऊट, ठवरे कॉलनी
नासिक नगर नागपूर - ४४००२४

**(आदेश पारित दिनांक २७/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. ०४/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०१/२०११ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर होते. गैरतक्रारदार देखील हजर होते परंतू त्यादिवशी संस्थेच्या काही रेकॉर्ड पाहण्यास उपलब्ध झाले नाही म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख २७/०१/२०११ देण्यात आली होती. त्यानुसार दि.२७/०१/२०११ च्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांचे आयोगाकडील अपील क्र. ९५८/२०१० दि. ०४/०८/२०१० यामध्ये दिलेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा प्रमुख कार्यवाहा, ठवरे गृहनिर्माण सहकारी संस्था न्यु

सुभेदार ले आऊट नागपूर यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून तक्रारदार यांनी दि.०४/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. आजच्या सुनावणीस तक्रारदार हे हजर आहेत व त्यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील अपील क्र. ९५८/२०१० मधील दि. ४/८/२०१० च्या निर्णयात श्री न.दा. वहाणे प्रमुख कार्यवाहा ठवरे गृह निर्माण सहकारी संस्था नागपूर यांनी अपीलकर्ता यांना संस्थेच्या संपूर्ण अभिलेखाचे (पडताळणी) अधिनियमाचे कलम २ (त्र) प्रमाणे निरिक्षण करण्याकरिता अभिलेख उपलब्ध करुन द्यावे असे आदेशात होते. त्याकरिता अपीलकर्ता यांनी संस्थेस एखाद्या रविवारची वेळ लेखी कळवून उपस्थित राहून अभिलेख्यांचे निरिक्षण करुन आवश्यक त्या कागदपत्रांची मागणी योग्य खर्चाचा भरणा करुन घ्यावी. अपीलकर्ता यांनी संस्थेस लेखी कळविल्यानंतर अपीलकर्ता यांना संस्थेचे कार्यवाहा यांनी किंवा माहिती अधिकारी नियुक्त करुन माहिती अधिकारी यांनी निरिक्षणासाठी संस्थेचे अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात यावे. तसे न केल्यास माहिती अधिकारी यांचे विरुध्द किंवा पदाधिकाऱ्यांविरुध्द शास्ती लादण्यात येईल. किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० प्रमाणे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येईल असे नमूद केले आहे.

४. जनमाहिती अधिकारी श्री न. दा. वाहणे यांनी आयोगापुढे सांगितले की, यापूर्वीच्या आयोगाच्या सुनावणीच्या नोटीस त्यांना प्राप्त झाल्या नाहीत म्हणून अपील क्र. ९५८/२०१० च्या सुनावणीस ते दि.४/८/२०१० रोजी उपस्थित राहू शकले नाही. तसेच त्यांनी आयोगासमोर निवेदन केले की, सदर संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाचा वाद सध्या सहकार न्यायालयात प्रलंबित आहे सहकार न्यायालय यांचेकडील दि. ९/७/२०१० च्या आदेशाप्रमाणे संस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या दि.२७/११/२००८ च्या सभेला तात्पुरता मनाई हुकुम मिळाला आहे. म्हणून सदर संस्थेच्या नवीन संचालक मंडळाविषयी निर्णय मा. सहकार न्यायालयात प्रलंबित आहे त्याचा निर्णय येत्या काही दिवसात

लागण्यासाठी कार्यवाही सुरु आहे. तथापी तक्रारदार यांना संस्थेचे आवश्यक ते रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत त्यांनी संमती दिली. त्याचप्रमाणे सध्या त्यांच्याकडे संस्थेचे जे रेकॉर्ड आहेत ते रेकॉर्ड तक्रारदार यांना निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील आणि निरिक्षणाअंती तक्रारदार यांना ज्या कागदपत्रांची आवश्यकता असेल त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती योग्य त्या खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन देण्यात येतील मात्र संस्थेच्या संचालक मंडळाविषयीचे प्रकरण सहकार न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्यामुळे संस्थेचे पदाधिकारी म्हणून त्यांच्या सहीने कोणतेही कागदपत्रे देता येणार नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून आज आयोगासमोर तक्रारदार आणि श्री वाहणे यांनी संमतीने असे ठरलि की, तक्रारदार यांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेले रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल त्यासाठी दोघांच्या संमंतीने दि. २०/०२/११ रोजी तक्रारदार यांनी दुपारी १२.३० वाजता श्रावस्ती शिक्षण संस्थेच्या उच्च प्राथमिक शाळेच्या कार्यालयात नवीन सुभेदार नगर नागपूर येथे उपस्थित रहावे व त्याठिकाणी श्री वाहणे यांनी तक्रारदार यांना संपूर्ण रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे व तक्रारदारास पाहिजे असलेल्या माहितीच्या प्रती योग्य त्या खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन द्याव्यात. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार श्री डोंगरे यांनी दि.२०/२/११ रोजी श्रावस्ती शिक्षण संस्थेच्या कार्यालयात दुपारी १२.३० वाजता उपस्थित रहावे व त्याठिकाणी श्री वाहणे यांनी संपूर्ण रेकॉर्डसह हजर राहून श्री डोंगरे यांना रेकॉर्डचे निरिक्षण करु द्यावे आणि त्यांना पाहिजे असलेली माहिती योग्य त्या खर्चाचा भरणा करुन उपलब्ध करुन द्यावी.

२.	तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**<u>तक्रार क्र. २८६/२०१०</u>**

१. श्री शिवशंकर आनंदराव आजबले - **तक्रारकर्ता**
टंडन वार्ड, भंडारा
ता. जि. भंडारा

२. जनमाहिती अधिकारी (माध्य) - **गैरतक्रारदार**
जिल्हा परिषद, भंडारा

**(आदेश पारित दिनांक २१/०१/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारकदार यांनी दि. १२/०७/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत गैरतक्रारदार यांच्या तर्फे उपशिक्षणाधिकारी श्री गुढे हे हजर आहेत.

२. तक्रारदार यांचे आयोगाकडील तक्रार क्र. ५/२०१० दि. १५/०६/२०१० मध्ये दिलेल्या निर्णयातील आदेशाप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा यांनी संबंधीत संस्थेत असलेली नस्ती निरिक्षणाकरिता तक्रारदार यांना उपलब्ध करुन द्यावयाची होती. परंतू तक्रारदार यांना नस्ती निरिक्षणासाठी उपलब्ध करुन त्यातील छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. त्यामुळे तक्रारदार यांनी दि. १२/०७/२०१० रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे दिसून येते. तसेच आयोगाचे कार्यालयाकडून गैरतक्रारदार यांना त्यांच्याविरुध्द शास्ती का लादण्यात येवू नये याबाबत दि.३१/०८/२०१० च्या पत्रान्वये ८ दिवसात खुलासा मागविण्यात आला होता.

त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दि. २०/०९/२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे खुलासा दाखल केलेला दिसून येतो. त्यानंतर पुन्हा दि. ३०/१०/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी खुलासा सादर केलेला आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना आयोगाकडील दि.१५/०६/२०१० च्या आदेशाप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद भंडारा यांनी संबंधीत संस्थेत असलेली नस्ती निरिक्षणा करिता उपलब्ध करुन द्यावयाची होती व आवश्यक प्रती विनामुल्य द्यावयाच्या होत्या. परंतू अद्यापपर्यंत कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यावर कोणतीच कार्यवाही सुध्दा अद्यापपर्यंत केलेली नसल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे त्यांनी सांगितले.

४. आजच्या सुनावणीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. भंडारा हे गैरहजर आहेत त्यांचे तर्फे श्री ओ. बी. गुढे, उपशिक्षणाधिकारी हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, तक्रारदार यांना यापूर्वी वेळोवेळी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. २१/११/२००९ रोजी काही माहिती तक्रारदारास उपलब्ध करुन दिलेली आहे.

५. तक्रारदार व उपशिक्षणाधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, आयोगाकडून दि. १५/०६/२०१० रोजी निर्णय देण्यात आला होता की, शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. भंडारा यांनी संस्थेत असलेल्या नस्ती निरिक्षणाकरिता तक्रारदारास उपलब्ध करुन देऊन तक्रारदार यांना आवश्यक असलेल्या प्रस्तावाच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. परंतू शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. भंडारा यांनी अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

त्यामुळे या विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून आयोगाच्या दि. १५/०६/२०१० च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही का केलेली नाही याबाबत त्यांनी १५ दिवसात आयोगाकडे खुलासा दाखल करावा अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार त्यांचेवर शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी. याकरिता तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत तक्रारदार यांना शिक्षणाधिकारी (माध्य) जि. प. भंडारा यांनी संबंधीत संस्थेत असलेली नस्ती तक्रारदार यांना निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावी. आणि त्यातून तक्रारदार यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

२. आयोगाकडील दि.१५/०६/२०१० च्या निर्णयाप्रमाणे शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प. भंडारा यांनी याबाबत का कार्यवाही केलेली नाही याचा खुलासा १५ दिवसात आयोगाकडे सादर करावा अन्यथा ते शास्तीस पात्र राहतील.

३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. ३३३/२०१०**

१. श्री शाम रामचंद्र मेश्राम - **तक्रारकर्ता**
इंदोरा बुध्द विहारा जवळ,
पो. बेझनबाग, ता. जि. नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३ - **गैरतक्रारदार**
प्रशासकीय इमारत क्र. १
नागपूर

**(आदेश पारित दिनांक २१/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. २२/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २७/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ११८६/२०१० मधील दि.०३/०९/२०१० च्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून आयोगाकडे दि.२२/१०/२०१० रोजी तक्रार दाखल केली.

३. तक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, नगर भूमापन क्र. ४, ६, ७ या मिळकतीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी यांचे नाव दाखल झाले आहे त्या

बाबत त्यांना माहिती पाहिजे आहे तसे आयोगाचे आदेश सुध्दा आहेत. परंतू त्यांना अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

४. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३ नागपूर हे उपस्थित असून त्यांनी सांगितले की, आयोगाकडील अपील क्र. ११८६/२०१० मधील दि. ०३/०९/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन सुनावणीमध्ये माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारे शोध घ्यावा व तसे तपशिलामध्ये अपीलार्थीस कळवावे असे आयोगाचे आदेश होते. त्या आदेशास अनुसरुन प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा भूमि अभिलेख नागपूर यांनी अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांची सुनावणी दि. २०/०१/२०११ ला घेतली आणि त्याच दिवशी निर्णय दिला. सदर निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी वादी यांचे अर्जावर जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र. ३ नागपूर यांनी फेरफार क्र. १८७, १८८, १८९ सन १९८७ चे प्रकरण कार्यालयात आढळत नसल्याबाबत कळविण्यात येऊन ७/१२ अधिकार अभिलेखा प्रमाणे देण्यात आला असल्याचे कळविलेले आहे त्यामुळे वादी यांचा दि. २१/०६/२०१० चा अपील अर्ज खारीज केलेला आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी या आदेशात असेही नमूद केले की, वादी यांना आवश्यक असल्यास नगर भूमापन क्र. ४, ६ व ७ ची आखिव पत्रिकेची प्रत नगर भूमापन अधिकारी क्र. ३ नागपूर यांचेकडून नियमानुसार शासकीय फी चा भरणा करुन घ्यावा. तक्रारदार यांनी शासकीय फी चा भरणा केल्यानंतर आखिव पत्रिका उपलब्ध करुन देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र याबाबत तक्रारदार यांनी नगर भूमापन क्र.४, ६ व ७ या मिळकतीवर डॉ बाबासाहेब आंबेडकर को. ऑपरटिव्ह हाऊसिंग सोसायटी यांचे नाव दाखल झाले आहे ते चुकीचे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून याबाबत तक्रारदार यांनी सक्षम अधिकारी यांचेकडे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ अतंर्गत दाद मागणे योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. ३३६/२०१०**

१. श्री अरुण उराडे - **तक्रारकर्ता**
घर नं. ३९९, वार्ड नं. २२,
चामोर्शी रोड, आशिर्वाद नगर,
ता. जि. गडचिरोली

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **गैरतक्रारदार**
गडचिरोली

**(आदेश पारित दिनांक २७/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारकदार यांनी दि. १०/११/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ४३५/२०१० मधील दि.२५/०५/२०१० च्या आदेशाप्रमाणे तहसिलदार गडचिरोली यांनी कोणतीही कार्यवाही अद्यापपर्यंत केलेली नाही व कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही अशी तक्रार दि. १०/११/२०१० रोजी आयोगाकडे दाखल केली आहे.

३. तक्रारकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, आयोगाकडील अपील क्र. ४३५/२०१० दि.२५/०५/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कागदपत्रे गहाळ केल्या प्रकरणी संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये FIR दाखल करण्याबाबत आयोगाचे आदेश होते. मात्र त्याप्रमाणे FIR दाखल झाला नाही तसेच संबंधीत कर्मचारी यांना निलंबीत करण्यात यावे अशी तक्रारदार यांनी आयोगापुढे मागणी केली.

४. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार गडचिरोली यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील अपील क्र. ४३५/२०१० मधील दि. २५/०५/२०१० च्या निर्णयास अनुसरुन दि. १६/०८/२०१० रोजी दस्तेगाशा क्र. ९४/२००८ दि. २६/०३/२००८ हे कागदपत्रे गहाळ केलेल्या कर्मचाऱ्यांवर पोलीस स्टेशन गडचिरोली येथे FIR दाखल करण्याकरिता रिपोर्ट देण्यात आलेला असून पोलीस स्टेशन गडचिरोली यांनी त्यांच्याकडील गहाळ झालेल्या कागदपत्रांच्या रजिस्टर मधील या तक्रारीची नोंद अनुक्रमे ३१५ वर घेतलेली आहे आणि त्याबाबत तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार गडचिरोली यांनी दि.१२/१०/२०१० च्या पत्राने कळविलेले आहे. आणि सदरचे पत्र मिळाल्याचे तक्रारदार यांनी मान्य केले.

५. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, तहसिलदार गडचिरोली यांनी पोलीस स्टेशन गडचिरोली येथे दि. १६/०८/२०१० रोजी FIR दाखल केली असून त्याबाबतची माहिती तक्रारदार यांना दि. १२/१०/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.	तक्रारदार  यांची  तक्रार  खारीज करण्यात येते.

२.	तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. ३३५/२०१०**

१. श्री सादिक अली रमजान अली - **तक्रारकर्ता**
नयी बस्ती, आझाद नगर, टेका,
सलाम मिठाईवाले के सामने,
नागपूर - ४४० ०१७

२. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक - **गैरतक्रारदार**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

**(आदेश पारित दिनांक २७/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २१/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत. मात्र लेखी खुलासा आयोगाकडे सादर केलेला आहे.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ११६७/२०१० मधील दि. ०१/०९/२०१० च्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना माहिती माहिती उपलब्ध न झाल्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. यांचेविरुध्द आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील अपील क्र. ११६७/२०१० मधील दि. ०१/०९/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना मुद्या क्र. १ च्या सदंर्भात पाचवी ते दहावी असा एकत्रीत तपासणी अहवाल प्रत उपलब्ध झाल्यानंतर विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावा असे आदेश दिले होते. मात्र तक्रारदार यांना अद्यापपर्यंत मा. आयोगाचे

आदेशाप्रमाणे एकत्रीत तपासणी अहवालाची प्रत प्राप्त झाली नाही असे तक्रारदार यांनी सुनावणीत सांगितले.

४. गैरतक्रारदार हे गैरहजर आहेत मात्र त्यांनी दि. २५/०१/२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे खुलासा सादर केलेला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांनी दि. २३/०९/२०१० च्या पत्रान्वये तक्रारदार यांना असे कळविले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपील क्र. ११६७ मधील दि. ०१/०९/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे निर्देशित केले होते. परंतू शाळेची वार्षीक तपासणी केलेली नाही करिता वार्षीक तपासणी अहवाल देता येत नाही. सदरचे दि. २३/०९/२०१० चे पत्र तक्रारदारास मिळाल्याबाबत तक्रारदार यांनी मान्य केले. मात्र तक्रारदार यांना इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतची एकत्रीत तपासणी घेतली नाही असे स्पष्टपणे त्यांना शिक्षणाधिकारी यांनी कळविणे जरुरीचे आहे. असे त्यांचे म्हणणे आहे म्हणून तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत तक्रारदार यांना इयत्ता पाचवी ते सातवीची तपासणी केलेली नाही असे स्पष्टपणे कळवावे.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. ३३९/२०१०**

१. श्री यूवराज यशवंतराव हूमने - **तक्रारकर्ता**
रा. मोदी पडाव, कामठी,
जि. नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, - **गैरतक्रारदार**
प्रशासकिय इमारत क्र.१ सिव्हील लाईन्स, नागपूर

**(आदेश पारित दिनांक २७/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १४/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी माहिती अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर यांचेकडे दि.२२/१०/२०१० रोजी १ ते ५ मुद्यांवर माहती मागितलेली होती. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, ग्राहक मंचापुढे तक्रारदार आपली केस आपल्या अधिकृत प्रतिनिधीच्या माध्यमातून लढु शकतो की कसे, एक व्यक्ति किती तक्रारकर्त्यांचा अधिकृत प्रतिनिधी असू शकतो पुराव्यानिशी माहिती, तसेच ग्राहक संरक्षण कायदा १९८६ च्या कोणत्या कलमात

ही माहिती दिली आहे तसेच मंचाचे अध्यक्ष किंवा तक्रारदार यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत केस लढण्यास मनाई करुन शकतो अगर कसे आणि ग्राहक संरक्षण कायदा १९८६ च्या कोणत्या कलमात मंचाच्या अध्यक्षास किंवा सदस्यास तक्रारकर्त्याला त्याच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत केस लढण्यास मनाई करण्याचे अधिकार दिले आहेत. अशी एकूण ५ मुद्यांवर जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर यांचेकडे माहिती मागितली होती. त्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि.०२/११/२०१० च्या पत्रान्वये १ ते ५ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू सदर माहिती खोटी व बनावटी असल्याचे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी आयोगापुढे सांगितले की, तक्रारदार यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. २५/१०/२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जातील एकूण ५ मुद्यांची माहिती तक्रारदार यांना दि. ०२/११/२०१० च्या पत्रान्वये मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

५. तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०२/११/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली माहिती प्राप्त झाली. असल्याचे मान्य केले. मात्र सदर माहिती चुकीची असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. कारण ग्राहक संरक्षण कायदा कलम १६ हा (Appearance of Voluentary Consumer Oraganisation) च्या संबंधीत आहे. म्हणून कलम १६ हे अधिकृत प्रतिनिधीच्या संबंधीत नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी ही माहिती चुकीची दिलेली आहे असे तक्रारदार यांनी तक्रारीत नमूद केले आहे. यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, ग्राहक संरक्षण कायदा कलम १६ हा Voluentary Consumer Organisation आणि अधिकृत प्रतिनीधी या दोघांनाही लागू आहे आणि सदरची माहिती

तक्रारदार यांना ग्राहक संरक्षण कायदा १९८६ च्या तरतुदीला अनुसरुन दिलेली आहे. त्यामुळे त्यांना कोणतीही चुकीची माहिती दिलेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

६. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२/११/२०१० च्या पत्रान्वये १ ते ५ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र तक्रारदार यांचा ग्राहक संरक्षण कायदा कलम १६ बाबत अर्थ लावण्याचा वाद दिसून येतो. म्हणून त्याबाबत तक्रारदार यांनी योग्य त्या मंचाकडे किंवा प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ३३८/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अब्दुल रब (छोटे) व. हाफीज अब्दुल सईद<br>इस्माईलपुरा कामठी,<br>जि. नागपूर | - | **तक्रारकर्ता** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता<br>नगर परिषद, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक २७/०१/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारदार यांनी दि. १४/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१/१२/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २७/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत.

२. तक्रारदार यांनी आयोगाकडील त्यांचे अपील क्र. ४३१/२००९ मधील दि. २५/०८/२००९ च्या पारित आदेशाप्रमाणे दि. १५/११/२००८ च्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र.१ ची माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, नगर परिषद कामठी चे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी देखील जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री बोरकर यांना दि.०१/१२/२००९ च्या पत्रान्वये तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले होते. मात्र जनमाहिती अधिकारी तथा

कनिष्ठ अभियंता नगर परिषद कामठी श्री बोरकर यांनी दि. १५/११/२००८ च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ ची माहिती दिलेली नाही म्हणून त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी अशी आयोगापुढे मागणी केली.

४. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद कामठी हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, श्री बोरकर जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी आयोगाच्या दि.२५/०८/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना त्यांचे दि. १५/११/२००८ च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. वास्तविक पाहता सदर माहिती आयोगाचा निर्णय प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आत देण्याबाबत आयोगाचे आदेश होते मात्र जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री बोरकर यांनी तक्रारदार यांना मुद्दा क्र.१ ची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला दिसून येतो. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्याबद्यल त्यांच्यावर रु.५०००/- ची शास्ती का लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांच्याकडून मागविणे योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी मुद्दा क्र. १ ची माहिती तक्रारदार यांना हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषदयांनी तक्रारदारास माहिती देण्यास विलंब केलेला दिसून येतो. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा

कनिष्ठ अभियंता नगर परिषद कामठी श्री बोरकर यांना विलंबाबाबत त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. ५०००/- ची शास्ती का लादू नये याचा खुलासा आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसात सादर करावा. अन्यथा त्यांचेवर शास्ती कायम करण्यात येईल.

२. सदरच्या निर्णयाची एक प्रत नगर परिषद कामठी यांचेकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ३४९/२०१०</u>**

१. श्री सुनिल रामदास जगताप - **तक्रारकर्ता**
प्लॉट नं.३, अयोध्यानगर, न्यु सुभेदार रोड, नागपूर
जि. नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक - **गैरतक्रारदार**
जिंगल बेल्स हायस्कुल
हिवरी ले आऊट, बगडगंज भंडारा रोड, नागपूर-८

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
जिंगल बेल्स प्राथमिक शाळा (हिंदी आणि मराठी)
हिवरी ले आऊट, बगडगंज भंडारा रोड, नागपूर-८

४. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
भारती विानिकेतन प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळा
जूना बगडगंज, भंडारा रोड, नागपूर - ८

**(आदेश पारित दिनांक २९/०१/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारदार यांनी दि. २५/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार गैरहजर आहेत. सर्व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. १०५४/२०१०, १०५५/२०१०, १०५६/२०१० मधील दि. १७/०८/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तीनही अपीलांबाबतची माहिती मिळालेली नाही म्हणून आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

३. तक्रारदार हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिंगल बेल्स हायस्कुल नागपूर, जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिंगलबेल्स प्राथमिक शाळा (हिंदी मराठी) नागपूर आणि जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक भारती विद्या निकेतन प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळा नागपूर हे तीनही जनमाहिती अधिकारी उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपील क्र. १०५४/२०१० मधील आयोगाच्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना मुख्याध्यापक मान्यतेची प्रत दि.२६/०८/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली असून मुख्याध्यापक मान्यतेच्या प्रस्तावाची प्रत मात्र उपलब्ध झाली नाही व तसे तक्रारदारास कळविलेले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. मुख्याध्यापक मान्यतेचा प्रस्ताव हा सुमारे १० वर्षाच्या पूर्वीचा असून दि.२५/१०/२००१ रोजी पाठविलेला आहे. सदरच्या प्रस्तावाचा शोध घेतला असता अद्यापही तो प्रस्ताव मिळालेला नाही. मात्र मुख्याध्यापक मान्यतेची प्रत तक्रारदारास उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपील क्र. १०५५/२०१० आणि अपील क्र. १०५६/२०१० यामध्ये आयोगाने दिलेल्या आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दि. २६/०८/२०१० च्या पत्रान्वये शाळा मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावित रिझर्व बँक चालान क्र. १५०९०/३/२४-२७ दि.१४/१०/१९८६ हा चालान नंबर कळविलेला आहे मात्र चालानची प्रत उपलब्ध झाली नाही. कारण सदरचे चालान हे सन १९८६ चे असल्यामुळे ती प्रत उपलब्ध झाली नाही. मात्र चालान क्र. तक्रारदार यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच सन २००४ ते २०१० पर्यंतचे लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध झालेले नाही असे देखील तक्रारदारास दि. २६/०८/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले आहे. लेखा परिक्षणाबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असेही सांगितले की, शाळेचे सन २००४ ते २०१० पर्यंचे लेखापरिक्षण अद्याप झालेले नाही. ते लेखापरिक्षण झाल्यानंतर लेखा परिक्षणाच्या अहवालाची प्रत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यांनी सादर केलेल्या लेखी खुलाशावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना मुख्याध्यापक मान्यतेची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे चालानचा क्रमांक उपलब्ध करुन दिलेला आहे. आणि २००४ ते २०१० पर्यंतचा लेखापरिक्षण अहवाल अद्याप शाळेचे लेखा परिक्षण झालेले नसल्यामुळे उपलब्ध झाले नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच शाळा सुरु झाल्यापासून २००६ पर्यंतचा तपासणी अहवाल उपलब्ध नाही असे देखील तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. परंतू शाळेचे सन २००४ ते २०१० पर्यंतचे लेखापरिक्षण झाल्यानंतर लेखापरिक्षण अहवालाची प्रत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी शाळेचे सन २००४ ते सन २०१० पर्यंतचे लेखापरिक्षण झाल्यावर त्याचा अहवाल त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आत तक्रारदार यांना उपलब्ध करुन द्यावा. अन्यथा ते शास्तीस पात्र राहतील.

३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ३५०/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री किशोर शेषरावजी डोमके,<br>रा. तोंडाखैरी, पो. धापेवाडा, ता. कळमेश्वर,<br>जि. नागपूर | - | **तक्रारकर्ता** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा<br>तहसिल कार्यालय, कळमेश्वर ता. कळमेश्वर<br>जि. नागपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक २९/०१/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारदार यांनी दि. २०/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. १२५९/२०१० मधील दि.१७/०९/२०१० च्या आदेशाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांना सर्व्हे नं. २१२ च्या लेआऊटची प्रत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध असल्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असे आयोगाचे आदेश असतांनाही जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

४.      जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी मंडल अधिकारी व तलाठी यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाच्या दि. १७/०९/२०१० च्या आदेशानुसार तक्रारदार यांना दि. २९/१०/२०१० रोजी तहसिल कार्यालयात बोलविण्यात आले आणि त्यांना आयोगाच्या आदेशाप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. त्यामध्ये सर्व्हे नं. २१२ च्या ले आऊटची प्रत देखील होती. सदरची माहिती मिळाल्या बद्यलची तक्रारदार यांची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीचेवेळी सादर केली. परंतू तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित असल्याची त्यांची सही, तसेच कागदपत्रे पाहिले असता माहिती मिळाली असे नमूद केलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा त्यांच्याकडे माहितीची एक ज्यादा प्रत असलेली आयोगापुढे तक्रारदारास उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तक्रारदार यांना आज एकूण १ ते १३ मुद्यांची माहिती मिळाली व त्यामध्ये सर्व्हे नं. २१२ च्या लेआऊटची प्रत देखील त्यांना देण्यात आली. त्यामुळे तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून संपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१.      तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येते.

३.      तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ३४६/२०१०</u>**

१. श्री वसंत रोहिदास मून - **तक्रारकर्ता**
प्लॉट नं. २१, राणी दुर्गावती चौक
इतवारी स्टेशन रोड, नागपूर - १७

२. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक - **गैरतक्रारदार**
स्वास्थ्य विभाग, आसीनगर झोन क्र. ९,
महानगर पालिका, नागपूर

**(आदेश पारित दिनांक २९/०१/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारदार यांनी दि. २९/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र. ११२७/२०१० व अपील क्र. ११२८/२०१० मधील दि. १८/०८/२०१० च्या आदेशाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांचे अपील क्र. ११२७/२०१० व अपील क्र. ११२८/२०१० मधील दि. १८/०८/२०१० च्या निर्णयाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी

तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्याचे आयोगाचे आदेश होते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा त्यावर कोणतीही कार्यवाही सुध्दा केली नाही. म्हणून तक्रार दाखल केली आहे.

४. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा झोनल अधिकारी (स्वास्थ्य) डी. ई. रंगारी हे उपस्थित असून त्यांनी सुनावणीत सांगितले की, आयोगाच्या दि. १८/०८/२०१० च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदारास दि.१८/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच स्वास्थ्य विभागाशी संबंधीत असलेली माहिती तक्रारदारास दि.३१/०५/२०१० च्या पत्रान्वये दिल्याचे नमूद केले आहे. तसेच तक्रारदार यांना पाहिजे असलेली माहिती पशुवैद्यकीय अधिकारी आणि अतिक्रमण विभागाशी संबंधीत आहे. या दोनही विभागांकडून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी दि. ११/०८/२०१० च्या व दि. १२/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती मागविलेली आहे. मात्र अद्याप पर्यंत विद्यमान जनमाहिती अधिकारी (स्वास्थ्य) यांना पशुवैद्यकीय विभाग व अतिक्रमण विभाग यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी असेही नमूद केले की, आयोगाकडील अपील क्र. ११२८/२०१० मधील दि. १८/०८/२०१० च्या आदेशात रु. २५०००/- ची शास्ती वसूलीसाठी जनमाहिती अधिकारी श्री एल. एस. खान यांचेकडे दि.१९/११/२०१० रोजी पत्र पाठवून शास्तीची रक्कम भरण्याबाबत कळविलेले आहे. मात्र खान हे दि. ३०/०६/२०१० रोजी निवृत्त झाले आहेत. त्यामुळे त्यांना शास्तीची रक्कम भरण्याबाबत कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. तक्रारदार व विद्यमान जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, तक्रारदार यांना स्वास्थ्य विभागाशी संबंधीत असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे मात्र पशुवैद्यकीय विभागाशी आणि अतिक्रमण विभागाशी संबंधीत असलेली

माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे आत पशुवैद्यकीय विभाग व अतिक्रमण विभाग यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती माहिती प्राप्त झाल्यावर त्वरीत तक्रारदार यांना उपलब्ध करुन देणे योग्य राहील. त्याकरिता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी पशुवैद्यकीय विभाग आणि अतिक्रमण विभाग यांचेकडून ३० दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन घ्यावी. आणि ती माहिती उपलब्ध झाल्यावर त्वरीत तक्रारदारास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

३. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. ३४७/२०१०**

१. श्री कमलेश विजयकुमार मालवार, - **तक्रारकर्ता**
बाराखोली, नारा रोड, जरीपटका
नागपूर - १४

२. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, - **गैरतक्रारदार**
नगर रचना विभाग,
महानगर पालिका, नागपूर

**(आदेश पारित दिनांक २९/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. २०/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील अपील क्र.१३८९/२०१० मधील दि.०३/११/२०१० च्या आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांचे आयोगाकडील अपील क्र. १३८९/२०१० मधील दि.०३/११/२०१० च्या आदेशाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदारास त्यांच्या भुखंडावर बांधकाम

परवानगी ज्या कागदपत्रांचे आधारे नाकारलेली आहेत ती कागदपत्रे १५ दिवसात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्यावर कोणतीही कार्यवाही सुध्दा केलेली नाही.

४. जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, मनपा नागपूर हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाच्या आदेशानुसार दि.१५/११/२०१० रोजी खसरा क्र. ६४ यावर मंजूर विकास आराखड्यानुसार असलेला निवासी वापर दर्शवून त्यांना खसरा क्र. ६४ च्या प्लानची प्रत दिली आहे. तसेच तक्रारदार यांच्या भूखंडाचा खसरा क्र. ६४ हा निवासी क्षेत्रात नव्हता. मात्र आता खसरा क्र. ६४ यावर मंजुर विकास आराखडयानुसार असलेला निवासी वापर दर्शवून त्यांना खसरा क्र. ६४ च्या प्लानची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. याबाबत तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, पूर्वी महानगर पालिकेने त्यांना कोणत्या कागदपत्रांच्या आधारे बांधकामाची परवानगी त्यांना नाकारलेली होती ती माहिती तक्रारदार यांना पाहिजे आहे म्हणून सदर माहिती तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना त्यांच्या भूखंडावर पूर्वी बांधकाम परवानगी कोणत्या कागदपत्रांच्या आधारे नाकारण्यात आली आहे याबाबत हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२.  तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार

**तक्रार क्र. ३४८/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री डॉ के. आर. सोनपुरे<br>ए- ४-१ डॉक्टर्स कॉलोनी<br>अजनी नागपूर - ४४० ००३ | - | **तक्रारकर्ता** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा<br>इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>सेन्ट्रल एव्हेन्यू रोड, नागपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक २९/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. १४/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांच्या आयोगाकडील तक्रार क्र.१३७/२००९ मधील दि. १८/०८/२००९ च्या ओदशान्वये सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख यांनी वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करुन अर्जदाराच्या अर्जातील मुद्या क्र. डी व ई मध्ये नमूद केल्याप्रमाणे चौकशी करुन चौकशी अहवाल आयोगास ३ महिन्याचे आत सादर करावा असे आदेशीत केले होते. परंतू त्यांनी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. असे तक्रारीत नमूद केलेले आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील तक्रार क्र. १३७/२००९ दि.१८/०८/२००९ च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्या क्र. डी व ई या दोन मुद्यांची माहिती देण्यासाठी अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांना वरीलप्रमाणे आदेशीत केले होते. परंतू मुख्य मुद्यास बगल देण्यात आली आहे असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. तसेच दि. १८/०८/२००९ च्या आदेशाप्रमाणे डॉ. डोंगरे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती गठीत केली त्या चौकशी समितीत डॉ. कुबडे आणि डॉ. मुद्येश्वर यांची नेमणूक केली. मात्र डॉ. कुबडे हे माजी माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करणे योग्य नव्हते. तसेच डॉ. कुबडे व डॉ. मुद्देश्वर यांनी अपूर्ण व चुकीची आणि दिशाभूल करणारी माहिती दिली आणि सदर माहितीची कोणतीही शहानिशा डॉ. डोंगरे यांनी न करता सदरच्या माहितीचा अहवाल आयोगाकडे सादर केलेला आहे असेही तक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले.

४. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक श्री मडावी इंदिरा गांधाी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे उपस्थित आहेत त्यांनी सुनावणीत सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात त्यांनी दि.२९/०१/२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे सविस्तर खुलासा सादर केलेला आहे. त्या खुलाश्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आयोगाकडील तक्रार क्र. १३७/२००९ मधील निर्णय दि.१८/०८/२००९ नुसार सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख यांनी वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करुन तक्रारदार यांच्या अर्जातील डी व ई मध्ये नमूद केल्याप्रमाणे चौकशी करण्यात येवून सदरचा चौकशी अहवाल तीन महिन्याचे आत सादर करण्याचे आयोगाचे आदेश होते. त्यानुसार अधिष्ठाता यांनी डॉ कुबडे व डॉ. मुद्देश्वर या दोन डाक्टरांची दि. १६/१०/२००९ रोजी कमेटी नेमली व त्याचा चौकशी अहवाल आयोगाकडे दि.१६/११/२००९ रोजी सादर केला. सदरच्या चौकशी अहवालाची प्रत आयोगाकडून तक्रारदार यांना मिळाली व त्यासोबतची कागदपत्रे देखील तक्रारदार यांना मिळाली मात्र तक्रारदार यांना मुद्या क्र. डी व ई या संबंधातील अपेक्षित कागदपत्रे त्या अहवालात प्राप्त

झालेली नाहीत असे तक्रारदार यांनी आयोगासमोर सांगितले. यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, दोन सदस्यांच्या कमेटीने दिलेल्या अहवालात जी कागदपत्रे लावलेली होती त्यासह तो अहवाल आयोगाकडे सादर केला आहे. आणि त्या अहवालाची प्रत आयोगाच्या कार्यालयातून तक्रारदार यांना प्राप्त झालेली आहे. त्या शिवाय जनमाहिती अधिकारी यांचेकडे कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, आयोगाचे तक्रार क्र. १३७/२००९ मधील दि. १८/०८/२००९ च्या आदेशानुसार चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्या समितीने दि. १६/११/२००९ रोजी चौकशी अहवाल आयोगाकडे सादर केलेला दिसून येतो. त्या चौकशी अहवालात जी कागदपत्रे आहेत त्यासह चौकशी अहवालाची प्रत आयोगाच्या कार्यालयातून तक्रारदार यांना उपलब्ध झालेली दिसून येते. म्हणून चौकशी अहवालात असलेल्या कागदपत्रांच्या व्यतिरिक्त तक्रारदार यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. डी व ई ची माहिती उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना कळविणे संयुक्तिक होईल म्हणून तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत आयोगाकडे सादर केलेल्या चौकशी अहवालासोबत जी कागदपत्रे दिली आहेत त्या कागदपत्रांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे तक्रारदार यांच्या अर्जातील मुद्या क्र. डी व ई संबंधात उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य व्यक्तीशः किंवा डाक नोंदणीने कळवावे.

२.                तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ३५३/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कै. श्री उदाराम राजेराम बावनकर<br>मु. पो. खापा, वार्ड क्र. ८,<br>ता. सावनेर, जि. नागपूर | - | **तक्रारकर्ता** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद खापा, जि. नागपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक ३१/०१/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारदार यांनी दि. २९/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार श्री उदाराम राजेराम बावनकर यांचा मृत्यु झाला असल्यामुळे त्यांचे पुत्र श्री ज्ञानेश्वर बावनकर हे हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांचा मुलगा श्री ज्ञानेश्वर बावनकर यांनी सुनावणीत सांगितले की, मौजे खापा येथे महानगर पालिकेने त्यांना प्लॉट क्र. ५७ हा पूर्वी लिजवर दिला होता. तथापी त्यांच्या प्लॉट नं. ५७ वर नगर पालिकेने रस्ता रुंदीकरण केले. त्या रस्ता रुंदीकरणाच्या ठेकेदाराच्या नावाची माहिती तसेच निविदा ठेका देण्याची सूचना व जाहिरात आणि प्लॉट क्र. ५७ वर काम सुरु करण्याची तारीख इ. बाबतची माहिती त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये मागितली होती. त्यांना नगर पालिकेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदर माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही.

म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहिती बाबत त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी सुनावणीचेवेळी असेही सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून १ ते ११ मुद्यांची माहिती दि. १२/०३/२०१० च्या पत्रान्वये प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे दोन मुद्यांच्या माहितीसाठी रु. २०/- च्या फी चा भरणा केला त्यानंतर दोन मुद्यांची माहिती मिळाली मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्याचे तक्रारदार यांनी सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद खापा जि नागपूर हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी सुनावणी दरम्यान असे सांगितले की, तक्रारदार कै. श्री उदाराम राजेराम बावनकर यांनी दि.०४/०२/२०१० ला माहिती अधिकारा अंतर्गत त्यांना दिलेल्या प्लॉट क्र. ५७ च्या लिज बाबत माहिती मागितली होती. ती माहिती त्यांना दि. १२/०३/२०१० च्या पत्रान्वये दिलेली आहे. तसेच दि. १९/०३/२०१० च्या अर्जाची माहिती दि.२२/०३/२०१० च्या पत्रान्वये दिलेली आहे. या माहिती मध्ये त्यांनी रस्त्याचे व नालीचे काम करणाऱ्या कंत्राटदाराबाबत माहिती मागितली होती ती त्यांना देण्यात आलेली आहे. नगर पालिकेने प्लॉट क्र. ५७ हा श्री उदाराम राजेराम बावनकर रा. खापा यांना सन २००७-२००८ ते २००९/२०१० या कालावधीकरीता भाडेपट्टयाने देण्यात आला होता. आता ही जागा खापा सावनेर गडेगाव बायपास रोडवर मध्यभागी असून त्यांच्या सभोवताली रस्ता चौपदरी सिंमेंटीकरण केले आहे. तसेच रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने रुंद करण्यात आला. असून गावातील रस्त्याचे सौंदर्यीकरण लक्षात घेता प्लॉट क्र. ५७ ची लीज पुढे नाकारण्यात आलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच तक्रारदार यांनी प्लॉट क्र. ५७ च्या जवळ केलेल्या कामाबाबत माहिती मागितली होती. तक्रारदार यांच्या प्लॉट क्र. ५७ हा बाजार चौक न्यु मेडीसीन हॉल ते गडेगाव नाक्यापर्यंत मुख्य रस्त्याबाबतच्या आर. सी. सी. पाईप लाईन व साईड बंबचे चे बांधकाम करण्याचा ठेका श्री आर. एम. पुरे कंत्राटदार यांना देण्यात आला होता. त्या वर्क ऑर्डरची दि. ३१/०८/२००९ ची प्रत तक्रारदार यांना दिलेली आहे. मात्र तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, प्लॉट क्र. ५६ जवळचे काम श्री शंभरकर ह्या

ठेकेदारास देण्यात आले होते त्याबाबतची माहिती त्यांना दिली नाही. याबाबत मुख्याधिकारी यांनी असे सांगितले की, तक्रारदार यांच्या प्लॉट क्र. ५७ जवळून सावनेर नाका ते गडेगाव बायपास पर्यंत रस्ता रुंदीकरण केले आहे. त्याचे ठेकेदार श्री सुनिल आवळे हे आहेत. श्री शंभरकर या ठेकेदाराला हे काम दिलेले नाही. म्हणून तक्रारदार यांना सावनेर नाका ते गडेगाव बायपास पर्यंत रस्ता रुंदीकरण करण्याचे काम श्री सुनिल आवळे या ठेकेदारास दिले असल्यामुळे त्याबाबतची माहिती तक्रारदार यांना हवी आहे असे तक्रारदार यांनी सांगितले.

४. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२/०३/२०१० च्या पत्रान्वये आणि दि. २३/०३/२०१० च्या पत्रान्वये तक्रारदार यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी तक्रारदार यांना श्री सुनिल आवळे ठेकेदार यांना दिलेल्या ठेक्याची माहिती पाहिजे आहे. म्हणून ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदारास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत सावनेरनाका ते गडेगाव बायपास पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणाचा ठेका श्री सुनिल आवळे यांना दिलेला आहे त्याबाबतची माहिती तक्रारदारास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२.		तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**तक्रार क्र. ३५७/२०१०**

१. श्री भगवानदास मैय्यदिन समुन्द्रे - **तक्रारकर्ता**
रा. गंगाबाई घाट, म.न.पा. क्वार्टर नं.७
नागपूर

२. जनमाहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक - **गैरतक्रारदार**
आरोग्य विभग, महानगर पालिका,
जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ३१/०१/२०११)**

**निर्णय**

१. तक्रारदार यांनी दि. ०७/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३१/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे अपील क्र. १३८५/२०१०, १३८६/२०१०, १३८७/२०१० आणि १३८८/२०१० मधील दि. ०३/११/२०१० च्या आदेश क्र. १ प्रमाणे लाड कमिटीचे टेबल पाहणारे तात्कालीन लिपीक श्री महेश ससनकर आणि श्री संतोष बैरीसाल यांना कार्यालयात प्रत्यक्ष बोलवून श्री भगवान समुन्द्रे यांनी मागितलेल्या माहितीचा कसून शोध घेण्याकरिता विद्यमान जनमाहिती अधिकारी यांना आदेशा दिले होते. परंतू त्यासंबंधीत अपूर्ण माहिती तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. जी माहिती पाहिजे आहे ती दिलेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली आहे परंतू सदर माहिती ही अपूर्ण असून त्यांना जी माहिती हवी आहे ती माहिती न देता व अर्जात त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांचा उल्लेख केलेला असतांना सुध्दा कोणत्याच कागदपत्रांच्या प्रती पुरविलेल्या नाहीत.

४. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक आरोग्य विभाग मनपा यांनी आयोगापुढे सांगितले की, आयोगाकडील दि. ०३/११/२०१० चे आदेशानुसार तक्रारदार १) श्री भगवानदास समुन्द्रे यांनी श्री राजू भगवान समुन्द्रे अर्ज क्र. ५७०३ दि. १८/१२/२००७, २) ज्योती श्रीराम गवनेर अर्ज क्र. ५७०१ दि.१८/१२/२००७, ३) श्री राकेश भगवानदास समुन्द्रे अर्ज क्र. ५७०२ दि. १८/१२/२००७ यांच्या नौकरी मिळण्याबाबतच्या अर्जाच्या प्रती तक्रारदार यांना ०३/१२/२०१० च्या पत्रान्वये रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतू रुपा भगवानदास समुन्द्रे यांच्या अर्जाची नोंद नोंदवहीत नसल्यामुळे ती माहिती तक्रारदार यांना उपलब्ध होवू शकली नाही. तसेच श्री भगवानदास समुन्द्रे यांनी मागितलेल्या माहिती नुसार दि.१२/०३/१९९३ व दि. १८/१२/१९९७ च्या नौकरी मिळण्याबाबतच्या प्रकरणाची नोंद नगर पालिकेच्या नोंद रजिस्टरमध्ये नाही. तसेच तक्रारदार यांच्याकडे त्या प्रकरणाची पोच देखील नाही. म्हणून दि.१२/०३/१९९३ व दि.१८/१२/१९९७ च्या अर्जाच्या प्रती नगर पालिकेच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या नसल्यामुळे त्यांना संबंधीत माहिती उपलब्ध करुन देता येवू शकली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. याबाबत तक्रारदार यांना दि.१२/०३/१९९३ आणि दि. १८/१२/१९९७ च्या नौकरी मिळण्याबाबतच्या अर्जाची पोच मागितली असता तक्रारदार ते सुनावणीत उपलब्ध करु शकले नाही. त्यामुळे सदरचे अर्ज नगर पालिकेकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

५. तक्रारदार व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तक्रारदार यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३/१२/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध असलेली माहिती दिली असल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) अंतर्गत तक्रार**

**<u>तक्रार क्र. ३५४/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री समाधान शिवराम पोहरकर,<br>रा. कांद्री (कन्हान) त. पारशिवनी,<br>जि. नागपूर - ४४१ ४०१ | - | **तक्रारकर्ता** |
| २. | जनमाहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी<br>जिल्हा परिषद, नागपूर | - | **गैरतक्रारदार** |

**(आदेश पारित दिनांक ३१/०१/२०११)**

**<u>निर्णय</u>**

१. तक्रारदार यांनी दि. ०२/१२/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १२/०१/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३१/०१/२०११ रोजी तक्रारीच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे आयोगाकडील तक्रार क्र. १५९/२०१० मधील दि. ०१/११/२०१० च्या निर्णयातील आदेश क्र. १ नुसार जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश असतांना देखील माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून तक्रारदार यांनी आयोगाकडे पुनश्च तक्रार दाखल केली आहे.

३. तक्रारदार यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांची तक्रार क्र. १५९/२०१० दि. १/११/२०१० मधील निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी व चूकीची माहिती दिलेली असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे पुनश्च तक्रार दाखल केली आहे. तसेच त्यांनी मागितलेल्या २० मुद्यांची माहिती त्यांना देण्यात यावी व याबाबत त्यांनी जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना पत्र सुध्दा दिले आहे मात्र अद्यापही त्यांना माहिती मिळालेली नाही असेही तक्रारदार यांचे म्हणणे आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, तक्रारदार यांच्या तक्रारअर्जाबाबत त्यांनी आयोगाकडे लेखी खुलासा दाखल केलेला आहे. तसेच त्यांनी सुनावणीत असेही सांगितले की, तक्रारदार श्री पोहरकर यांना माहिती देण्यासाठी आयोगाच्या दि. ०१/११/२०१० च्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना दि. ०९/११/२०१० रोजी कार्यालयात बोलवून सुनावणी घेण्यात आली त्यावेळेला तक्रारदार श्री पोहरकर यांनी सुधारित २० मुद्ये माहितीसाठी दिले ते मुद्ये संस्थेस देण्यात आले आणि त्यावर संस्थेकडून उत्तर आणि माहिती मागविण्यात आली. त्यानंतर दि.१५/११/२०१० रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. त्यात संस्थेचे पदाधिकारी व मुख्याध्यापक हे मुळ रेकॉर्डसह हजर झाले मात्र तक्रारदार यांनी रेकॉर्डचे निरिक्षण करण्यास नकार दिला म्हणून तक्रारदार श्री पोहरकर यांना मुद्येनिहाय माहिती दि.२५/११/२०१० च्या पत्रान्वये एकूण ८६ पाने पोस्टाद्वारे त्यांना पाठविण्यात आले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, तक्रारदार श्री पोहरकर हे सदर शाळेचे माजी कर्मचारी होते. त्यांना संस्थेने सेवेतून कमी केले आहे. त्याबाबतचा वाद नागपूर येथे उच्च न्यायालयात सुरु असून त्याचे रिट पिटीशन क्र. ४९२०/२००५ हे दाखल झाले असून सदरचे प्रकरण उच्च न्यायालयात न्याय प्रविष्ट आहे. तथापी तक्रारदार श्री पोहरकर हे उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना संस्थेत व त्यांच्या कार्यालयाविरुध्द सतत तक्रारी करित असून शाळेला व शाळेच्या पदाधिकाऱ्यांना मुद्दामच त्रास देत आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५.	जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना दिलेल्या माहितीचे आयोगासमोर अवलोकन करण्यात आले त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहितीचे ८६ पाने दिले आहेत. मात्र तक्रारदार यांना आणखी ज्या ६ मुद्यांची माहिती अपेक्षित आहे त्याची चर्चा आयोगासमोर करण्यात आली. व या ६ मुद्यांची उपलब्ध असलेली माहिती किंवा त्याची वस्तुस्थिती तक्रारदार यांना देण्याची संमती जनमाहिती अधिकारी यांनी दिली. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **आदेश**

१.	तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर झालेल्या चर्चेप्रमाणे ६ मुद्यांची माहिती किंवा वस्तूस्थिती तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२.	तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी. डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**